दैनिक **जनप्रवास** बातम्यांचा राजा

● शनिवार, दि. ४ जुलै २०२६



# उदय महाजन यांची वरिष्ठ संशोधक वर्ग १ अधिकारीपदी निवड

● विवेकानंद कॉलेजचे माजी विद्यार्थी महाजन यांचा सत्कार

**जनप्रवास : कोल्हापूर**

विवेकानंद कॉलेज कोल्हापूरमधील माजी विद्यार्थी उदय श्रीरंग महाजन यांची महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती विकास विभागामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या वरिष्ठ संशोधक वर्ग एक अधिकारी पदी निवड झाली आहे.

उदय महाजन हे विवेकानंद कॉलेजचे कला शाखेतील माजी विद्यार्थी असून सध्या स्थितीला महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती विकास विभागामध्ये गृहपाल म्हणून कार्यरत आहेत. २०२५ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वरिष्ठ संशोधक पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेमधून त्यांनी हे यश मिळवले आहे. या यशासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था प्राचार्य तथा कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे आणि संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राध्यापक वृंद, पालक यांचे मार्गदर्शन लाभले.